RNI. MAHMUL02805/2010/33461 **Impact Factor - 2.06** ISSN 0976-0377

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

उप-ग्रंथालय

## REFERRED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Vol. X, Issue : VII**
**Year - 4 (Half Yearly)**
**Jan. 2013 to Jun. 2013**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication Pvt. Ltd.
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

Price ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. Milind Lokhande**
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College,
Nanded, Dist. Nanded.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

# स्त्रीवादी विचारप्रवाह आणि भारतातील महिला सक्षमीकरणाचा प्रश्न

**डॉ. माणिक सोनवणे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पूणे, जि. पूणे

16 **Research Paper - Pol. Sci.**

मनूस्मृतीत म्हटल्याप्रमाणे - "यत्र नायस्तू पूज्यते, रमन्ते तत्र् देवता:" ज्याठिकाणी नारीची पुजा होते. मानसन्मान होतो त्या ठिकाणी देवता रममाण होतात. 'Women is moulder and builder of Nation' स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत जन्मांची माता असते, भारतीय संस्कृतीत स्त्रीला दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी म्हणून पूजले जाते.

एकीकडे आपण स्त्रीला एवढे पूज्य मानतो आणि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र याविरुद्ध परिस्थिती असते. नूकत्याच स्त्रीयांवर झालेल्या दोन अत्याचाराच्या घटनेमुळे संपूर्ण देश ढवळू निघाला.

दिल्लीत १६ डिसेंबर २०१२ "निर्भया" वर झालेल्या निघृण अत्याचारापासून स्त्रीमन, समाजमन सावरते न सावरते तोच दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश ए.के. गांगूली यांनी आपल्या सहकारी महिले वर अत्याचाराचे प्रकरण समोर आले. 'न्याय" व्यवस्थेतील "न्याय"दान करणाऱ्या देशातील सर्वोच्च "न्यायासना"तील "न्यायमूर्ती"नेच अन्याय केला. तर न्याय कोणाला मागायचा? दुसरे प्रकरण "तहेलका" साप्ताहिकाचे संपादक 'तरुण' तेजपाल यांनी 'म्हातारा' झालेला असूनही आपल्या हाताखाली काम करणाऱ्या आपल्या मूलींच्या वयाच्या मूलीवर अत्याचार केल्याचे समोर आले, आणि देशभर 'तहेलका' झाला.

वरील दोन घटनांमुळे भारतीय समाजात स्त्रीयांचे स्थान, स्त्रीयांचा दर्जा, स्त्रीयांची सुरक्षितता, स्त्रीसक्षमीकरण हे विषय पुन्हा नव्याने चर्चेत आले आहेत. कोणताही समाज, कोणतीही संस्कृती किती परिपक्व, उन्नत पातळीवर पोहोचली आहे हे समजण्याचे, मोजण्याचे एक परिमाण, मानदंड म्हणजे त्या समाजात असलेले स्त्रीयांचे स्थान, स्त्रीयांचा दर्जा आणि दुर्दैवाने भारतीय संस्कृतीत अजूनही स्त्री-पुरुष

समता हे तत्व पुर्णत: रूजले नाही. भारताला २१ व्या शतकात महासत्ता होण्याचे आपले "राष्ट्रीय ध्येय" Nation Vision आहे, भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान राष्ट्रभक्त शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नाप्रमाणे प्रमाणे भारताला महासत्ता होण्यासाठी सर्व प्रकारच्या विषमता, जात, धर्म, वर्ग, लिंग इ. विषमता नष्ट करुन एका नव्या 'समताधिष्टीत समाजनिर्मिती' ची आवश्यकता आहे.

त्यासाठी समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रातील महिलांचे योगदान आणि महिलांचे सक्षमीकरण वृद्धींगत करणे आवश्यक आहे. समाजातील सर्वात मुलभूत (Basic) विषमता स्त्री-पुरुष विषमता हीच आहे. स्त्री ही भारतीय समाजजीवनातील शोषित घटकांपैकी सर्वाधिक शोषित घटक आहे. आणि म्हणून भारतीय स्त्रीयांची स्थिती सुधारण्यासाठी समाजसुधारकांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. कारण काही सामाजिक समस्या या मुख्यत: स्त्रियांशीच संबंधित असतात. मग स्त्रीभ्रूणहत्येपासून तर त्यांचा अशिक्षितपणा, कुपोषण, अनारोग्य, बालमृत्यूदर, बालविवाह हुंडाप्रथा, हुंडाबळी, आर्थिक परावलंबन, राजकिय सत्तेत वास्तव सहभाग नसणे (Power lessness) इ. समस्यांची अमर्याद साखळी असते. आणि यासाठी जागतिक पातळीवर एक नवीन पर्व सुरु झाले. स्त्री-पुरुष समतेसाठी वैश्विक पातळीवर आंतरराष्ट्रीय पातळीवर जो लढा सुरु केला तो पुढील चार विचारप्रवाहात विभागला जातो.

१) उदारमतवादी स्त्री-पुरुष समतावादी विचारप्रवाह

२) समाजवादी विचारप्रवाह

३) जहाल स्त्रीवादी विचारप्रवाह

४) उत्तर आधुनिक स्त्रीवादी विचारप्रवाह

**१) उदारमतवादी विचारप्रवाह :**

उदारमतवादी परंपरेतील मेरी, वोल्स्टन क्राफ्ट (१७५९-९७) यांच्या 'vindication of the rights of women' (१७९३) या ग्रंथात समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्री-पुरुष समतेची आग्रही मागणी पुढे आली. जॉन स्टूअर्ट मिल (१८०६-७३) ने आपल्या 'Subjection of Right of Women' (१८६९) या ग्रंथात स्त्री-पुरुष संबंध मैत्रीवर आधारित असले पाहिजे प्रभूत्वावर नाही. असा विचार मांडला. त्याचप्रमाणे मिलने स्त्रीयांना सर्वप्रथम मताधिकाराची, संपत्तीत वारसा हक्काची मागणी केली.

**२) समाजवादी विचारप्रवाह (Socialist Stream) :**

इंग्लीश विदूषी शीला रोबाथम या प्रवाहाच्या प्रतिनिधी होत. हा प्रवाह जहाल स्त्रीवाद प्रणित पुरुष संज्ञेचे विश्लेषण आणि मार्क्सवादी वर्गमिमांसा यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. तसेच आर्थिक दृष्ट्या पुरुषप्रधान व्यवस्था ज्यात पुरुषाला खाजगी संपत्तीचा स्वामी मानले जाते. एवढेच नव्हे तर स्त्रीला देखील खाजगी संपत्तीच्या रुपात पाहिले जाते. याचा अंत करुन आर्थिकदृष्ट्या स्त्री-पुरुष समता करुन भांडवलशाहीचा अंत करण्याचा पुरस्कार हा विचार प्रवाह करतो.

**३) जहाल स्त्रीवादी विचारप्रवाह (Radical Feminism) :**

शुलामिथ फायरस्टोनसारख्या जहाल स्त्रीवादी विदूषीने असा तर्क मांडला की, फूटकळ स्वरुपाच्या सुधारणांच्या आधारे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराशी मुकाशी जाता येत नाही. आर्थिक परिवर्तन व सत्तेने देखील स्त्रीयांना फारसा लाभ होणार नाही. सर्व इतिहास हा स्त्रीयांवरील पुरुषी अत्याचाराचा इतिहास आहे. हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे जीवंत उदाहरण आहे. ही व्यवस्था नष्ट करण्यासाठी लैंगिकतेवर आधारीत श्रमविभागणी नष्ट केली पाहिजे. पुरुषांना स्त्रीयांवर कोणतेही वर्चस्व गाजवण्याची संधी दिली जाऊ नये. तर केवळ मानवजात नष्ट होऊ नये. यासाठी केवळ पुरुषाच्या पुरुषत्वाचा उपयोग केला जाईल. असा हा विचारप्रवाह मानतो.

**४) उत्तर आधुनिकतावादी (Post-moderhist) स्त्रीवादी विचारप्रवाह :**

हा विचारप्रवाह मात्र आता कोणतीही स्त्री-पुरुष विषमता राहिली नाही. उत्तर-आधुनिक युगात स्त्रीयांना जवळ-जवळ त्यांचे सर्व अधिकार मिळाले आहे. त्यामुळे आता संघर्ष करण्याची आवश्यकता राहिली नाही. कारण आता स्त्रीया पुरेशा आधुनिक झाल्या आहेत असे हा विचारप्रवाह मानतो. परंतु हा विचारप्रवाह मात्र अत्यंत मर्यादित अशा उच्चभ्रू वर्गातच आणि विकसित देशांतच अस्तित्वात आहे.

याशिवाय सिमॉन-द-बोकआर" या फ्रेंच लेखिकेने लिहिलेले 'Second Sex' या ग्रंथास स्त्रीवादाचे बायबल मानले जाते, एवढा तो महत्वाचा आहे. याशिवाय महिला सशक्तीकरणासाठी अलीकडील काळात २ जुलै २०१० पासून UN संयुक्त राष्ट्रे या संघटनेत UN Women ही नवीन महिला Wing शाखा घटक सुरु करण्यात आली आहे. भारताच्या परराष्ट्र राज्यमंत्री प्रेणित कौर (Preneet Kour) या संघटनेच्या संचालकपदी निवड झाली आहे.

**स्त्री सुधारणा आणि स्त्री सक्षमीकरणासाठीचे भारतातील प्रयत्न :**

भारतात महिला-सक्षमीकरणासाठी अनेक समाजसुधारणा चळवळी झाल्या आहेत. तसेच राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, गो.ग. आगरकर, महर्षी कर्वे यांच्यापासून तर सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्यासारख्या अनेक स्त्री समाज सुधारकांनी अथक प्रयत्न केले आहेत.

पंडिता रमाबाई यांना "भारतीय महिला चळवळीचे" जनक मानले जाते कारण त्यांनी पुण्याला आल्यानंतर न्यायमूर्ती रानडे यांच्या मदतीने "आर्य महिला समाजा"ची स्थापना (१८८२) मध्ये केली. १८८२ च्या शिक्षणासंदर्भातील हंटर कमिशनसमोर साक्ष दिली. १८९६-केडगाव येथे मुक्तीसदनची स्थापना केली. तसेच सावित्रीबाई फुले पहिली स्त्री शिक्षिका, पहिली स्त्री मुख्याध्यापिका असून त्यांचा जन्मदिन ३ जानेवारी स्त्रीमुक्तीदीन म्हणून साजरा केला जातो. तसेच बुलढाण्यातील ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना ग्रंथ लिहून स्त्री सुधारणेचे आग्रही प्रतिपादन केले.

तसेच कायद्याच्या दृष्टीने विचार करता स्त्री-संरक्षण-स्त्री सबलीकरणासाठी सरकारने कित्येक कायदे अस्तित्वात आणले. १८२९ च्या सती बंदी कायद्यापासून तर विधवापुनर्विवाहाला समंती देणारा

कायदा १८५६ पर्यंत ब्रिटिश काळात विविध कायदे झाले. १९४१ मध्ये सर बेनेगल नरसिंहराव समितीने हिंदू कायद्याचे सुसूत्रीकरण करुन हिंदू कोड बिल तयार केले.

हिंदू स्त्रियांच्या हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड या बिलाचा आग्रह धरला. त्यांनी हिंदू कोड बिलाचे चार-निरनिराळे भाग करुन कायदे केले. ते म्हणजे

१) हिंदू विवाह कायदा
२) हिंदू वारसा कायदा
३) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा
४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा

असे चार कायदे संहिता (१९५५-५८) मध्ये संमत झाले त्याला हिंदू कोड बिल म्हणतात. दुर्दैवाने हे त्यांच्या कायदा मंत्री पदांच्या कारकीर्दीत पारित न झाल्यामुळे त्यांनी या प्रश्नांवर राजीनामा दिला.

तसेच १९६१ हुंडाप्रतिबंधक कायदा १९९४ मधील PCPNDT : Prenatal and Pre-Conception Dignostic Technique (Prohibition) Act) १९९४ याशिवाय अगदी अलीकडील काळात १९९२ मध्ये राजस्थानातील भवरी देवी या ग्रामसेवक महिलेवर झालेल्या सामुहिक बलात्कार न्याय न मिळाल्यामुळे महिला हक्कांसाठी लढणारी -विशाखा नावाची महिला हक्क संघटना सर्वोच्च न्यायालयात गेली या खटल्याचा निकाल १९९७ मध्ये लागला. आणि महिला सुरक्षेसंदर्भात हा अतिशय महत्वाचा Laudmark Judgement मानला जातो. कारण या विशाखा खटला (१९९७) सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या शोषणाविरुद्ध Sexuel Abuse or Sexual harrasment विरुद्ध काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली त्यालाच विशाखा Guidelines म्हणतात. त्यानुसार

१) महिलाचे कामाचे ठिकाणी होणारे लैंगिक शोषण संघटीत क्षेत्रातील असो की असंघटित क्षेत्रातील यासाठी संसदेने अत्यंत कडक (Harsh) कायदा करावा.
२) संघटित क्षेत्रात जेथे १० महिला काम करतात त्यासाठी एक अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केली जिची अध्यक्ष महिलाच असेल.

असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन केली जावी जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी तीचा प्रमुख असावा. आणि महिलांच्या तक्रारीचे निवारण विशिष्ट कालावधीत पूर्ण केले जावे. त्यामुळे "निर्भया" प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने "कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ" प्रतिबंधक अधिनियम २३ सप्टेंबर २०१२ पारित केला. तसेच महिला सुरक्षिततेसाठी १००० कोटीचा निर्भया निधी निर्माण केला. या जे. एस. वर्मा, न्या. उषा मेहरा यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला सुरक्षा समिती' स्थापन केली. न्या. जे. एस. वर्मा व न्या. उषा मेहरा यांच्या अध्यक्षतेखाली महिला सुरक्षिततेसाठी शिफारशी, उपाययोजना सुचविण्यासाठी समित्या स्थापन केल्या आहेत.

असे असले तरी स्त्री-पुरुष एकमेकांचे शत्रू नसून एकमेकांना परस्परपुरकच आहे. दोघेही एकमेकांशिवाय अपूर्ण असून एकमेकांना पूर्णत्व प्रदान करण्यासाठीच निसर्गाने त्यांना जाणीवपूर्वक परस्परपूरक बनविले आहे. म्हणूनच आपण निसर्गाचा आदर ठेवून एकमेकांना सहकार्य करुन "आदर्श मानवी संस्कृती" निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. म्हणूनच मला वाटते.

"छोडो कल बाते कल की बाते कल की बात पूरानी,
नये दौर मे लिखे हम मिलकर नयी कहानी।"

असे झाले तर भारताची जवळपास ५०% असणारी स्त्री शक्ती राष्ट्राच्या विकासास हातभार लाऊ शकेल व भारत खऱ्या अर्थाने महासत्ता होऊ शकेल.

## संदर्भ सूची

१) ऑम्व्हेट गेल (१९९८) : ज्योतीबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार, लोकवाड्.मय प्रकाशन, मुंबई
२) इंगोले विजय मुरलीधर (२००३) : न्यायज्योती माई सावित्रीबाई फुले, राजेश इंगोले, अंबाजोगाई
३) महाराष्ट्र राज्य महिला आयोग अहवाल - १९९८ 'महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा - वस्तुस्थितीचे विश्लेषण'. १९८१ ते १९९५ महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई १९९८.
४) युनायटेड नेशन्स डॉक्युमेंटस् १९९१, 'उमेन्स चॅलेंज टू द इयर २०००' युनायटेड नेशन्स प्रकाशन, न्यूयार्क.

PLEASE VISIT OUR WEBSITE
Www.irasg.com